# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक ०१/१०/२०१८ रोजी (का.प.क्र.०९) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक ०१ ऑक्टोंबर २०१८ रोजी **(दि.०३.०९.२०१८ रोजीची तहकूब सभा व दिनांक २५.०९.२०१८ रोजीची पुढे ढकललेली सभा, का.प.क्र.०९)** मा.सभापती, श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह सेथे सकाळी ११.३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०७. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०८. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०९. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१०. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
११. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१२. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१३. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल :माजी महापौर, श्री.मनमोहनसिंगओबेरॉय, तसेच माजी स.सदस्य श्री.सलीम मौलाना यांचेही निधन झाले. श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.सभापती :ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.
(यावेळी स्व.मनमोहनसिंग ओबेरॉय व स्व.सलीम मौलाना यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्रीमती स्वाती नागरे :महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत सायकल व शिलाई मशिन व इतर साहित्य वाटप का होत नाही?

श्रीमती सत्यभामा शिंदे :या समितीमार्फत महिला व मुलींसाठी विविध प्रशिक्षण दिले जाते असे सायकल व शिलाई मशीन वाटप होत होते ते बंद का केले ?

श्रीमती जयश्री कुलकर्णी :माझे वार्डात शिवण कला क्लास चालु आहे. दोन बॅच पुर्ण झाल्या सहा महिन्याचा कालावधी असतो तेथे शिकवणीसाठी कुणी नाही. सध्या श्रीमती जोशी मॅडम शिकवितात. आता ४ महिन्याचा कालावधी झाला पुढील काळात शिकवणीसाठी श्रीमती जोशी मॅडम यांचा कार्यकाळ वाढविण्यात यावा.

श्री.रुपचंद वाघमारे :तीन चार वर्षापासुन वार्डात लाभार्थीना शिलाई मशीन व सायकल मिळत नाही. लोक आमच्याकडे मागणी करतात. वाटप का होत नाही?

श्री.गजानन बारवाल :या समितीच्या माध्यमातुन ज्या योजना असतील त्या राबविण्यात याव्यात, विलंब होऊ नये. या समितीचे बजेट खर्च झाले पाहिजे.

कक्ष प्रमुख-म.व बा.क. :ब्युटी पार्लर, एमएससीआयटी, टॅली कोर्स प्रशिक्षण संदर्भात सचिका कार्यवाही अंतर्गत आहे. शिलाई मशीन वाटप संदर्भात शासन निर्णय आलेला आहे की, आता निधी लाभार्थीच्या खात्यामध्ये जमा करावा. धोरणात्मक निर्णयासाठी संचिका कार्यवाहीस्तव

आहे. जवाहर कॉलनी येथे तीन शिवण क्लास शिक्षकेमार्फत चालविण्यात येत होते. दोन शिक्षक सेवानिवृत्त झाल्या, श्रीमती जोशी मॅडम ऑक्टोबर मध्ये निवृत्त होणार आहे. त्यांना मुदत द्यावी आस्थापनेकडे प्रस्ताव पाठविला.

श्री.सिध्दांत सिरसाट : जे-जे प्रशिक्षण घेतो त्याबाबत सदस्यांना वेळीच कळविले जात नाही.

श्री.गजानन बारवाल :तीन वर्षापासुन संचिका प्रलंबीत आहे. कार्यवाही होत नाही. ही समिती नुसती नावाला आहे का? जे-जे दोषी असतील कार्यवाही करावी.

श्री.सभापती : तीन वर्षापासुन योजना का राबविल्या जात नाही. जो निधी या समितीचा असतो, तो लॅप्स झाला का ?

कक्ष प्रमुख-म व बा क : संचिका बघुन माहिती देण्यात येईल.

अति.आयुक्त :या समितीचा निधी लॅप्स होणार नाही. याची दखल घेऊन लेखा विभागाकडुन सर्व माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल. तीन वर्षात खर्च का केला नाही? याची माहिती घेतली जाईल.

मा.सभापती :महिला बालकल्याण समितीच्या मार्फत राबविण्यात येणा-या योजना तातडीने कार्यान्वित कराव्यात. तीन वर्षात योजना का राबविल्या गेल्या नाही? चौकशी करावी. योजना जाहीर केल्यानंतर सर्व सदस्यांना कळविण्यात यावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:शासनाने डिसेंबर-२०१५ पुर्वीची बांधकामे नियमीत करण्याचा अध्यादेश जुलै-२०१७ मध्ये जारी केला. परंतु त्या संदर्भात मनपाच्या नगररचना विभागाने कोणतीही जनजागृती केली नाही. त्यामुळे या वर्षभरात नागरीकांकडुन प्रस्ताव दाखल होऊ शकले नाहीत. आताही नगररचना विभाग या कामाबाबत उदासीन असल्याचे दिसुन येत आहे. नगररचना विभागात नागरीकांना पुरेशी माहिती देण्यासाठी कोणतीही सुविधा करण्यात आलेली नाही. त्याऐवजी वास्तुविशारदांकडून प्रस्ताव देण्याचा सल्ला दिला जात आहे. राज्य सरकारने सन २००१ पुर्वीची बांधकामे नियमीत करण्यासाठी गुंठेवारी कायदा लागु केला होता, परंतु त्यात फारशी बांधकामे नियमीत होऊ शकली नाहीत. आता सरकारने ३१ डिसेंबर २०१५ पुर्वी बांधकामे नियमीत करण्यासाठी नवीन धोरण लागु केले आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेनेही १ एप्रिल पासुन अर्ज मागवले आहे. मात्र शासन निर्णयात दंडाची रक्कम खुप अधिक होती. त्यामुळे नागरीकांकडुन त्यास प्रतिसाद मिळत नव्हता. म्हणुन मनपाने दंडाच्या रकमेत ७५ टक्के सुट देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १ सप्टेंबरपासुन कपात केलेल्या दराने संचिका दाखल करुन घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी नगररचना विभागात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला. मनपाच्या सर्वसाधारण सभेत बांधकाम नियमीत करण्यासाठी दंडात कपात केली. त्यामुळे नागरीकांना दिलासा मिळाला परंतु हे प्रस्ताव नागरीकांना थेट दाखल करता येणार नाही. त्याऐवजी त्यांना वास्तुविशारदांमार्फत प्रस्ताव दाखल करावे लागणार आहेत. त्यामुळे नागरीकांना त्यासाठीचा खर्च सोसावा लागणार आहे. याचा प्रशासनाने विचार करावा. डिसेंबर २०१७ ला शासन निर्णय झालेला आहे. त्यानंतर ९ महिन्यानंतर हा कक्ष स्थापन होतो. सन २०१५ पुर्वीची बांधकामे नियमीत करायची आहेत. जवळपास अंदाजे १ हजार कोटी रुपये इतके उत्पन्न महानगरपालिकेला मिळाले असते. परंतु नगररचना विभागाने अधिकारी याकडे दुलर्क्ष करीत आहे. शहरातील दोन ते अडीच लाख मालमत्ता अनाधिकृत आहे. या बांधकामांना या नविन नियमाचा फायदा होऊ शकतो. परंतु नगररचना विभागाने याबाबत कोणतीही जनजागृती केली नाही. नगरसेवकांना सुध्दा याची माहिती देण्यात आलेली नाही. शासनाचा नविन जी.आर.नुसार ७ मीटर Roadwidth असलेल्या रस्त्यावर ५० फुटांपर्यंतचे बांधकाम नियमीत होऊ शकते. परंतु नागरीक जर या विभागात गेले तर ९ मीटर चा रस्ता असेल तरच बांधकाम नियमीत होऊ शकते असे सांगुन नागरीकांची दिशाभुल करण्यात येते. यापासुन महानगरपालिकेला बरेच उत्पन्न मिळु शकते. परंतु या अशा अधिका-यांमुळे

जर मनपाचे उत्पन्न कमी होत असेल तर याला जबाबदार कोण? वसुली आज ही कमी आहे. विनंती की, शासनाचा जो जी.आर.आहे ती मराठीत Translate करुन नगरसेवक व प्रसारमाध्यामांना द्यावा. वॉर्ड निहाय शिबीराचे आयोजन करुन नगरसेवकांना माहिती द्यावी. कमीत कमी या कामासाठी तरी नेहमीची पध्दत बाजुला ठेवुन स्पीड मध्ये काम करावे. फक्त १० टक्के इमारतींना कम्प्लींशन आहे. बांधकाम जर नियमामध्ये असेल तर Completion देऊन टाकावे. जास्त असेल तर दंड वसुल करा. त्याच्याही पेक्षा जास्त असेल तर पाडुन टाकावे. रेकॉर्डला एवढया फाईल पडुन आहेत की माझे मत असे आहे की, फाईल रेकॉर्डला जातेच कशी? ज्या बील्डरची बांधकामे जास्त आहेत तर त्यानंतर त्याच्या स्कीमला परमीशनच देऊ नये. नगररचनामध्ये कोण, काय काम करतात? काम करतो याचा बोर्ड (नामफलक) नाही. समजा श्रेयनगरचा व्यक्ति जर त्या विभागात गेला तर त्याला समजायला पाहिजे की कोणत्या इंजिनिअरकडे त्याचे काम आहे. अशा कोणत्याही प्रकारचा बोर्ड नरगरचना विभागात नाही. याचा खुलासा करा. माझा असा आरोप आहे की, विशिष्ट लोकांच्या मार्फत आलेल्या फाईल मंजुर होतात. बाकीच्या प्रलंबीत राहतात. नगररचनाचे सगळे लोक स्पेशल आहेत का? २०-२० वर्षापासुन त्यांची बदली झालेली नाही. अधिकारी तर सोडाच पण इथल्या चपराश्यांच्या पण बदल्या झालेल्या नाहीत. त्यांच्याकडे काय विशिष्ट डिग्री आहे का? नगररचना विभागाची प्रशासनामध्ये जर पारदर्शकता आणायची असेल तर महानगरपालिकेने नियमावली केली पाहिजे. नगररचना चे अधिकारी नगरसेवकांनी भेटत नाहीत तर सामान्य नागरीकांना कधी भेटणार? त्यांचे विशिष्ट एजंट पकडल्याशिवाय कामच होत नाही. जी.आर. येऊन १० महिने झाले त्यांच्या या ढिसाळ कारभारामुळे महापालिकेचे उत्पन्नच बुडत नाही तर नागरीकांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. त्याचे जर बांधकाम नियमीत झाले तर नागरीकांच्या सोईचे होईल. आपण जर राहिलेल्या ४ महिन्यांत चांगले काम केले तर सरकारकडुन मुदत वाढवुन घेऊ शकतो. २३५ कर्मचारी आपण वसुलीसाठी लावलेले आहेत. त्यातले १०० कर्मचारी जर फक्त Completion साठी लावले तर बऱ्याच प्रमाणात वसुलीत वाढ होईल. अशा या इतक्या बेजबाबदार अधिका-यांवर नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही केली पाहिजे. यांच्या वेळेच्या वेळी बदल्या कराव्यात ज्यामुळे यांची मक्तेदारी थांबवुन नागरीकांना त्रास होणार नाही. कोण-कोणते अधिकारी किती वर्षापासुन एकाच जागेवर आहे. याची संपुर्ण माहिती या समितीला सादर करावे. नगररचना विभागात किती कर्मचारी केव्हा पासुन कार्यरत आहे व आताच जे मी मुद्दे मांडले त्याची माहिती पुढील सभेत द्यावी.

श्री.गजानन बारवाल :न्यायालयात किती प्रकरणे प्रलंबीत आहे? किती प्रकरणात स्टे आहे? सर्व माहिती घ्यावी. मा.आयुक्त यंनी वक्तृव्य केले होते की, महापालिकेत दलाल आहे. त्याचाही खुलासा करावा.

श्रीमती राखी देसरडा :अनेक अधिकारी कर्मचारी सेवानिवृत्त होत आहे. अधिकारी कर्मचारी संख्या व आकृतीबंधाचा विचार करता अनेक पदे रिक्त आहे. अनेक उपअभियंता अतिरिक्त म्हणुन पदावर काम करीत आहे. वार्ड वाईज जेई सुध्दा १ किंवा २ आहे . एक वार्ड कमेटी अंतर्गत १५-२० वार्ड येतात. त्यामुळे कामाचा जास्त भार या अभियंत्यावर पडतो व त्यामुळे आयुक्तांवर कामाचे दडपण येते व मी कार्यालयात बसल्यावर दलालाची संख्या जास्त येते या असे प्रशासनाने म्हटले होते. त्याचाही खुलासा करावा. त्यांनी दलालाला न घाबरता ताठ मानेने काम करावे. आम्ही सदस्य त्यांचे पाठीशी आहोत. आकृतीबंधानुसार व रिक्त असलेली पदे तातडीने भरावी, तसे आदेशीत करण्यात यावे व त्याचा अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा.

श्रीमती सत्यभामा शिंदे :देवळाई-सातारा भागाचा समावेश केला. बांधकाम परवानगी का दिली जात नाही?

उपअभियंता-नगररचना :प्रशमित संरचना शुल्क म्हणुन शासनाचा जी-आर आलेला आहे. रितसर बांधकाम परवानगीसाठी आर्कीटेक्ट मार्फत प्रकरण सादर करुन घेता येईल या बाबत पेपरला माहिती दिली आहे. ऑनलाईन परवानगी देण्याची कार्यवाही होणार आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: प्रत्येक वार्ड निहाय जनजागृती करावी. जेणेकरुन सर्व मिळकत धारक घर लिगल करुन घेतील.

मा.सभापती :जनजागृती करावी, सर्व नागरीकांना बांधकाम परवानगी घेणेसाठी माहिती होईल. सातारा-देवळाई भागातही परवानगी द्यावी. बांधकाम परवानगी देणेसाठी ऑनलाईन काम करावे.

श्रीमती सायरा बानो :शहागंज भाजी मंडई भागात अतिक्रमण करुन सात दुकानाचे काम चालु होते.१५ दिवसात कार्यवाही करणार होते, का काढले नाही? पुर्ण दुकानाचे काम होईपर्यत काढले नाही.

अतिक्रमण अधिकारी : तीन दिवसात कार्यवाही होईल.

मा.सभापती :येथील दुकानाच्या बाबत मा.कोर्टात काही निर्देश आहे का? ते तपासवे तेथे अतिक्रमण झाले असेल तर काढुन टाकावे.

श्रीमती जयश्री कुलकर्णी : बालवाडी शिक्षकांना पगार वाढ करावी. ठराव मंजुर केला अद्याप कार्यवाही नाही.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी निर्णय घेतलेला आहे. पुढील सभेत तसा प्रस्ताव मान्यतेसाठी येईल.

श्रीमती सत्यभामा शिंदे :माझे वार्डात आदर्श रस्ता तयार करण्यात आला त्यावर गतीरोधक तसेच झेब्रा क्रॉसींग नाही त्यामुळे अपघात होत आहे.

मा.सभापती :या बाबत तातडीने कार्यवाही करावी.

श्रीमती नरगीस शेख :तीन महिन्यापासुन पाण्याचे लाईनचे मेंटेनन्सचे काम होत नाही एस टी कॉलनी मस्जीदच्या समोर सिमेंटची जुनी लाईन आहे ती बदलली जात नाही. सहा पाईप टाकण्याचे काम आहे होत नाही.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) :मेंटेनन्सचे काम चालु केले आहे.

श्री.गजानन बारवाल :माझे वार्डात पाण्याचा प्रश्न असुन लक्ष्मीनगर भागात पाणी येत नाही तसेच एक १५ लक्षचे कामाचा टेंडरचा प्रश्न सुटत नाही.

कार्य.अभियंता :सदर कामाचे टेंडर कुणी घेण्यास तयार नाही.

श्री.अब्दुल मं.नाविद :वार्डात ड्रेनेजचे दुषीत पाणी वाहते काम केले जात नाही.

मा.सभापती :ड्रेनेज,पाणीपुरवठा व लाईटची सर्व मेंटेनन्सची कामे प्राधान्याने करावी.

श्री.गजानन बारवाल :लेखा विभागाचा जमा व खर्चाचा अहवाल दरमहा का येत नाही?

मा.सभापती :जमा खर्चाचा अहवाल लेखा विभागाने स्थायी समितीमध्ये नियमित देण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :दि.२१-१२-२००९ रोजी गारखेडा येथील ११ दुकाने काढण्यात आली होती. त्या लोकांना पर्यायी जागा देणार होतो दिली नाही. त्याच भागात गुंठेवारी भाग आहे, तेथे नळ आहे, त्यांना टॅक्स लागलेला आहे, तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना नोटीस पण दिली होती, त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी कार्यवाही होत नाही. त्यांना पर्यायी जागा द्यावी. ११ पैकी दोन लोक श्रीमती कांताबाई, श्रीमती कांबळे यांनी मागणी केली आहे. त्वरीत त्यांना जागा द्यावी. त्या बाबतीत सर्व कागदपत्र देत आहोत.

मा.सभापती :ज्या लोकांच्या घरांना टॅक्स लागला आहे. गुंठेवारी केली नळ कनेक्शन दिले गेले त्याचे मिळकती हटवितांना त्यांना तोंडी आदेशानुसार पर्यायी जागा देण्याचे ठरले होते. यामध्ये संबंधीत अधिकारी यांनी लक्ष देऊन अशा नागरीकांना मनपाच्या मालकीची असलेली पर्यायी जागा देण्याची कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :श्री.कैलास एस.नवले हे महापालिकेत लघुटंकलेखक पदावर कार्यरत असुन त्यांनी पदोन्नतीने लघुलेखक उच्चश्रेणी पदावर नियुक्ती देणेसाठी वेळोवेळी प्रशासनाकडे अर्ज दिले आहे. आस्थापनेवर दोन लघुलेखक उच्चश्रेणीची पदे रिक्त आहे,एक पद खुल्या संवर्गासाठी आहे. ते खुल्या संवर्गातील असुन एका पदावर त्यांची पदोन्नतीने नेमणुक करावी.

मा.सभापती :श्री.कैलास एस.नवले हे सर्वसाधारण सभा असेल स्थायी समिती सभा असेल सर्वच बैठकांना त्यांना हजर राहुन इतिवृत नोंद व ते इतिवृत्तांत तयार करण्याचे काम करावे लागते हे मोठे स्वरुपाचे काम त्यांचेकडे आहे. अनेक वर्षापासुन ते या मनपाच्या सेवेत आहे. मनपाच्या आस्थापनेवर दोन लघुलेखक उच्चश्रेणी पदे रिक्त असुन त्यापैकी एक पद हे नामनिर्देशन असेल व इतर पध्दतीचा अवलंब करुन भरावे व एका पदावर श्री.नवले यांची पदोन्नतीने तातडीने नियुक्ती करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः फायर विभागाचे ऑडीट रिपोर्ट येणार होते. दोन महिने झाले अद्याप अहवाल दिला नाही.

मुख्य लेखा परीक्षक :अहवाल तयार करण्याचे काम चालु आहे. पुर्ण अहवाल झाल्यानंतर तपासुन सादर करण्यात येईल.

**<u>विषय क्र. ९२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये खुप ज्युन्या जलवाहिन्या असल्याने दुषित पाण्याच्या तक्रारींचे प्रमाण खुप जास्त आहे. त्यामुळे नागरीकांना शुध्द व निर्धोक पाणी पुरवठा करण्यासाठी अशा जलवाहिन्या बदलणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विविध वॉर्डामध्ये आवश्यकतेनुसार अशा जलवाहिन्या बदलण्यासाठी नवीन डी.आय.के.-७ जलवाहिन्या टाकण्याच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. काही अंदाजपत्रके मजीप्रा दरसुची सन २०१५-१६ व काही अंदाजपत्रके सन २०१६-१७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेली आहेत.

सदर कामांच्या निविदा साधारणतः अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५ ते ४०% जास्त दराच्या प्राप्त होत आहेत. त्यामुळे माहिती घेतली असता, बाजारात डी.आय. पाईपचे दर जास्त असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे डी.आय.के. पाईप उत्पादक कंपन्याकडून Budgetary Offer मागविण्यात आल्या आहेत.

मजीप्रा विभागाने सन २०१८-१९ ची दरसुची दि.०१/०६/२०१८ पासून लागू केलेली आहे. प्राप्त निविदांचे जास्तीचे दर पाहता चालू दरसुचीमध्ये डी.आय.के.-७ पाईपचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. मजीप्रा दरसुची सन २०१८-१९ नुसार Comparative केले असता, या दराने कामे करण्यास कंत्राटदार तयार नाहीत. परिणामी जलवाहिन्या टाकण्याची कामे होणे शक्य नाही.

करीता जलवाहिन्यांच्या कामांची आवश्यकता व बाजारात डी.आय.के.-७ पाईपचे असलेले वाढीव दर (Current Market Rates) पाहता पाईप करीता CMR दराने निविदांचे मुल्यांकन (Tender evaluation) करण्यास परवानगी मिळणे आवश्यक आहे. बाजारात पाईपचे दरामध्ये चढउतार होत असल्याने प्रत्येक महिन्यात त्या त्या वेळच्या बाजारभावाप्रमाणे निविदांचे मुल्यांकन करता येईल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा आदेशास्तव सादर. सदरील प्रस्ताव चे फेरविचार प्रत्येक महिन्यात करण्यात येईल.

कार्य.अभियंता-(पा.पु) :पुर्वी १५-१६ चा डीएसआरचा वापर करीत होतो. आता १८-१९ चा डीएसआर आलेला आहे. ५-१० टक्के दर वाढत असेल तर ते करु शकतो. त्यापुढे दर जास्त असेल तर त्याची मान्यता घ्यावी लागेल.

श्री.गजानन बारवाल :डीएसआरचे दर वाढले हेच कारण की दुसरे कारण आहे. माझे माहिती प्रमाणे ठेकेदारास पेमेंट वेळेवर मिळत नाही. म्हणून ते काम करण्यास पुढे येत नाही. घेतले तरी दर वाढवुन देतात.

मा.सभापती :बाजार भावाप्रमाणचे दर विचारात घेऊन मंजुरी घेण्यास हरकत नाही. योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.ऋषीकेश खैरे :वार्डातील विकास कामाचे जे प्रपोजल असेल ते पुर्ण होत नाही अनेक संचिका पाणी पुरवठ्याच्या प्रलंबीत आहे. लेखा विभाग मंजुर देत नाही.

कार्य.अभियंता :लेखा विभागाने मंजुरी दिल्यानंतर कार्यवाही होईल.

मा.सभापती :लेखा विभागात संचिका प्रलंबीत राहणार नाही,दखल घ्यावी.

श्री.सिध्दांत सिरसाट :डीएसआरचे दर वाढले की पाईपचे दर चेजेंस होतात परंतु पाईप सध्या शिल्लक आहे तर कामासाठी अडचण यायला नको पाहिजे.

मा.सभापती :पाणी पुरवठ्याची कामे प्रलंबीत राहु नये. हा विषय महत्वाचा आहे. मार्केट रेट काय आहे? याचा विचार करुन सर्व माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. हा विषय मंजुर करण्यात येतो. एकत्रित पाईप खरेदी करणे शक्य असल्यास तशी कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये खुप ज्युन्या जलवाहिन्या असल्याने दुषित पाण्याच्या तक्रारींचे प्रमाण खुप जास्त असून, त्यामुळे नागरीकांना शुध्द व निर्धोक पाणी पुरवठा करण्यासाठी अशा जलवाहिन्या बदलणे अत्यंत आवश्यक असल्याने व सदर कामांच्या निविदा साधारणतः अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५ ते ४०% जास्त दराच्या प्राप्त होत असल्याने, जलवाहिन्यांच्या कामांची आवश्यकता व बाजारात डी.आय.के.-७ पाईपचे असलेले वाढीव दर (Current Market Rates) पाहता पाईप करीता CMR दराने निविदांचे मुल्यांकन (Tender evaluation) करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद